**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे**

**सेवानिवृत अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता —**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. कलम ३९ (ज) अन्वये बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे, कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे, कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे, बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे, बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे, कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे, कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे, कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे, या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे, राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे इत्यादी कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे आहेत.

**महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातील अभियांत्रिकी विभागामार्फत खालील प्रमाणे कामकाज करण्यात येत आहे.**

१. बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्तावांची तांत्रिक छाननी करणे.
२. बाजार समित्यांना वितरीत केलेल्या कर्जाच्या विनियोगाची तांत्रिक छाननी करणे.
३. अपेडा, नवी दिल्ली, राष्ट्रीय कृषि विकास योजना, इतर वित्तीय संस्था यांचे अर्थिक सहाय्यातुन व पणन मंडळाच्या स्व:निधीतुन फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र उभारणीचे कामकाज करणे.
४. उभारणी करण्यात आलेल्या प्रकल्पांचे देखभाल दुरुस्तीची कामे करणे.
५. रा.कृ.वि.यो., DMI यांचेकडील अनुदानासाठी बाजार समित्यांच्या आवारातील विविध विकास कामांसाठी अनुदान प्रस्ताव तयार करणे व त्या संदर्भातील अनुषंगीक कामे करणे.
६. प्रकल्प सल्ला विभागाच्या मागणी नुसार बाजार समिती तसेच विविध संस्थांच्या प्रकल्पांची तांत्रिक छाननी करणे.

उपरोक्त प्रमाणे कामकाज करण्यात येत असुन पणन मंडळाचे स्थापत्य विषयक सर्व कामकाज राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गोदामे कामेमॅग्नेट प्रकल्प, रा.कृ.वि.यो. अंतर्गत गोदामे धान्यचाळणीची कामे, मंडळाच्या विविध निर्यात सुविधा केंद्राचे कामकाज, महाराष्ट्र शासनामार्फत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित "महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क" (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत १६ सुविधांचे आधुनिकीकरण व ३ सुविधा केंद्र नव्याने उभारणी व २ सुविधांचे अपेडा प्रमाणिकरण करणे कामकाज, रा.कृ.वि.यो. अंतर्गत प्रत्येकी १००० मे.टन क्षमतेचे १०८ गोदामांपैकी १०१ गोदामांची उभारणी पुर्ण झालेली असुन उर्वरीत ७

गोदामांच्या उभारणीकरिताची कामे प्रगतीत आहेत. तसेच रा.कृ.वि.यो. / ई-नाम अंतर्गत २ मे.टन प्रती तास क्षमतेचे धान्य चाळणी यंत्रांची उभारणी कामकाज, कृषि पणन मंडळाच्या सर्व स्थावर व जंगम मालमत्तांसंबंधित सातबारा उतारे, फेरफार उतारे, मालमत्तांचे नोंदणी केलेले दस्तावेज, नोंदणी करार, नुतनीकरण करार, भाडेपट्टा करार, शासकीय विभागांकडील मालमत्ता कर व मालमत्तेचा विमा उतरविणे इ. विषयक कामकाज करण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित विविध सुविधा केंद्र, विविध प्रकल्पाचे स्थापत्य विषयक कामकाजासाठी शासन सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या " **उप अभियंता** " या दर्जाच्या अधिकाऱ्याची कंत्राटी पध्दतीने नेमणुक करावयाची आहे. यबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

- **अटी व शर्ती**

**वय, अर्हता व अनुभव**

१. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्ष राहील. सदर नामिकासूचीतील व्यक्तिंमधुनच करार पध्दतीने उमेदवाराची नियुक्ती करणेत येईल.
२. उमेदवाराचे वय मर्यादा ५९ ते ६४ पर्यंत राहील.
३. उमेदवार राज्यशासनाच्या मंत्रालयीन किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवेतुन " **उप अभियंता** " या पदावरुन सेवा निवृत्त झालेला असावा.
४. शैक्षणिक पात्रता B.E.(Civil) असावी, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडील संबधित पदावरील कामाचा ३ वर्षाचा अनुभव असावा.
५. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
६. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी, किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
७. आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.
८. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल व उमेदवार निवडीबाबतचा संपुर्ण अधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास राहील.
९. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे मुख्यालय, पुणे येथील कार्यालयात काम करावे लागेल.

**पदसंख्या-** एकूण - ०१ पद

**कालावधी-** सुरुवातीस १ वर्षाकरीता (आवश्यतेनुसार कालावधी कमी/जास्त नुतनीकरण करता येईल.)

**मासिक वेतन-** शासन निर्णयातील तरतुदीनुसार अथवा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या नियमानुसार.

**इतर अटी व शर्ती**

१. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुंळे संबंधितास महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
२. विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास राहतील.
३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळावेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.
६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह दि.२६/७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे, प्लॉट नं. आर-7, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७ या कार्यालयास ई-मेल द्वारे (admin@msamb.com) या ई-मेल वर सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तथापी प्राप्त अर्जांचा विचार करता सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करणेबाबतची मुदत दि.०५/०८/२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तरी इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज उपरोक्त ई-मेलवर सादर करावेत. विहित कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. निवड प्रक्रिया बाबतचे सर्व अधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

अर्जाचा नमुना

शासन सेवानिवृत्त अधिकारी यांची करारपध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज.

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव :- -------------------------------------------

२) अर्जदाराचा पत्ता :- -------------------------------------------

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :- -------------------------------------------

४) सेवानिवृत्तीच्या वेळचे कार्यालय :- -------------------------------------------

५) भ्रमणध्वनी क्रमांक :- -------------------------------------------

६) जन्म दिनांक/वय :- -------------------------------------------

७) पणन मंडळास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय :- होय/नाही

८) अनुभव :-

| अ.क्र. | यापुर्वी काम केलेल्या विभागाचे नाव | कालावधी | कामाचे स्वरुप/विषय |
|---|---|---|---|
| | | | |

९) विशेष उल्लेखनीय काम :- ----------------------------------------

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या स्थापत्य विषयक कामकाजासाठी उप अभियंता दर्जाच्या शासन सेवानिवृत्त अधिकाऱ्याची सेवा करार पध्दतीने घेण्याकरीता नामिकासूची (Panel) तयार करण्याबाबतची जाहिरात व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संकेतस्थळावरील माहिती मी काळजीपुर्वक वाचली असुन, सदर जाहिरातीतील/माहितीमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी